# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १६/०७/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

### जबरी चोरी

**१) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील सावनेर ते सावंगी रोड दरम्यान असलेल्या विटभट्टीजवळ येथे दिनांक १५/०७/२२ चे १३.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– बाबा गोविंदा ठाकरे, वय ६० वर्ष रा. वार्ड क्र. ०१ तेलगाव ता. कळमेश्वर हे सावनेर ते तेलकामठी रोडने त्यांचे शाईन मोटरसायकलवर सावनेर येथील एसबीआय बॅकेतुन नगदी ५,००,०००/– रू. काढुन त्यांचे मोटरसायकलचे डिक्कीत लाल रंगाचे पिशवीत ठेवुन घरी मोटरसायकलवर जात होते. त्यादरम्यान सावनेर ते सावंगी रोड दरम्यान असलेल्या विटभट्टीजवळ फिर्यादीचे पाठीमागुन दोन मोटरसायकल वरील ४ अज्ञात आरोपीतांनी त्यांना गळयाला, पोटाला चाकु सारख्या हत्याराचा धाक दाखवुन फिर्यादीचे मोटरसायकलचे डिक्कीत ठेवलेले ५ लाख रूपये बळजबरीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३९२, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री नागवे मो.नं. ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा संचेती लेआउट येथे दिनांक १५/०७/२०२२ चे १७.०० वा. ते १७.५० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ. छाया विजयराव बागडदे वय ६६ वर्षे रा. संचेती लेआउट काटोल यांचे घरी एक २५ ते ३० वयोगटाचा अज्ञात आरोपी आला व त्याने 'भिसेचे घर कुठे आहे?' असे विचारले. तेव्हा फिर्यादीचे पतीने त्यांना सांगीतले कि, अणुसयापुरम येथे विचारपुस करा व तुम्ही येथे कश्यासाठी आला त्यावर तो म्हणाला कि सागर बागडदे यांनी लोन घेतले आहे. त्यावर फिर्यादीचे पती म्हणाले कि, 'माझा मुलगा मला सांगीतल्या शिवाय लोन घेवु शकत नाही'. त्यावर त्या आरोपीने फिर्यादीस म्हटले कि, 'काकु मला चहा दया' असे म्हणुण पलंगावर बसला. तेव्हा फिर्यादीचे पतीने तिला चहा बनविण्यास सांगीतले. फिर्यादी ही आपले घरात किचनमध्ये चहा बनवीण्याकरीता गेली असता अज्ञात आरोपी हा फिर्यादीचे मागे किचनमध्ये गेला व फिर्यादीचे कानातील रिंग ओडण्याचा पर्यंत केला. तेव्हा तिचे पती लगेच मागे आले तेव्हा आरोपीने फिर्यादीचे पतीला पाहुण फिर्यादीचे गळयातील सोन्याचे डोरले व मणी असलेले ५ ग्राम सोन्याचे मंगळसुत्र किमती अंदाजे कि. २५,०००/– रू. चा मुद्देमाल जबरदस्तीने हिसकावुन घराबाहेर पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५२, ३९२ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि पुनम कोरडे या करीत आहे.

# घरफोडी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील वार्ड क्र. ४, सिल्लेवाडा येथे दि. २०/०८/२०२० चे १२.०० वा. ते दि. १५/०७/२०२२ चे १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— राजकुमार जोखुराम यादव, वय ५४ वर्ष, रा. सिल्लेवाडा वार्ड क्र. ४, ह.मु.कवडस ता. सावनेर हे जन्मापासुन सिल्लेवाडा येथे राहत असुन दिनांक १९/०८/२०२० रोजी त्याचे घराशेजारी राहणारे त्याचे भावाने त्याचे मुलासह मिळुन लाली हसन खान याचा खुन केल्याने यातील फिर्यादीच्या मनात भिती उत्पन्न झाल्याने त्याने आपले घराला दि. २०/०८/२०२० रोजी कुलुप लावुन आपल्या परीवारासह कवडस ता सावनेर येथे राहण्यास गेला. दि. १५/०७/२०२२ रोजी सिल्लेवाडा येथे फिर्यादीने आपले राहते घरी परत येवुन पाहले असता घराचे समोरील दाराचे कुलुप तुटलेले दिसले. त्यांनी आत जावुन पाहले असता घरात असलेल्या कपाटात ठेवलेले सोन्या—चांदीचे दागिने असा एकुण कि. ८,५००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने दाराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश करून चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार उमेश ठाकरे मो.नं. ९८२२७६४९९९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**